महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २०९ वा | दिनांक : १२/०६/२०२५ | वार : गुरूवार

## मराठा समाजाच्या एसईबीसी आरक्षणाला स्थगिती नाही



**मुंबई :** राज्य सरकारने मराठा समाजाला एसईबीसी (SEBC) कायद्याअंतर्गत १० टक्के आरक्षण दिले होते. हे आरक्षण सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक प्रवेशांमध्ये देण्यात आले. मात्र, या निर्णयाविरोधात उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. त्याचबरोबर, आरक्षणाच्या समर्थनार्थही काही याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. आज मराठा आरक्षणासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. या सुनावणीत दोन्ही बाजूंनी वकिलांनी आपले युक्तिवाद मांडले.

सुप्रीम कोर्टाने मे महिन्यात मुंबई उच्च न्यायालयाला मराठा आरक्षणासंबंधी दाखल सर्व याचिकांवर सुनावणी घेण्याचे निर्देश दिले होते. या याचिकांमुळे उच्च शिक्षणात मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना आरक्षण मिळण्यात अडथळे निर्माण झाले आहेत. त्यामुळे मराठा आरक्षणाच्या वैधतेबाबत नव्याने सुनावणी आजपासून मुंबई उच्च न्यायालयात सुरू झाली आहे. आता हे आरक्षण कायद्याने मान्य ठरेल की नाही, याचा अंतिम निर्णय या सुनावणीतून होणार आहे.

मराठा आरक्षण प्रकरणावर मुंबई उच्च न्यायालयात विशेष त्रिसदस्यीय पूर्णपीठ, ज्यामध्ये न्यायमूर्ती रवींद्र घुगे यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठ आहे, सुनावणी घेत आहे. सुनावणीच्या सुरुवातीला, हे प्रकरण तात्पुरत्या दिलास्यासाठी घ्यायचे की अंतिम निर्णयासाठी घ्यायचे, यावर वकिलांमध्ये आणि न्यायमूर्तींमध्ये युक्तिवाद झाला.

विरोधी वकिलांनी "जोपर्यंत अंतिम निर्णय होत नाही, तोपर्यंत अंतरिम स्थगिती द्यावी," अशी मागणी केली. त्यानंतर, सरकारी वकिलांनी "हे प्रकरण थेट अंतिम सुनावणीसाठीच घेतले जावे," असा युक्तिवाद मांडला. मराठा आरक्षणाच्या सुनावणीबाबत बोलताना महाराष्ट्राचे महाधिवक्ता बिरेंद्र सराफ म्हणाले की, "सर्वोच्च न्यायालयात मराठा आरक्षणाला आधीच अंतरिम दिलासा आहे.मग पून्हा सुनावणी घेण्यात अर्थ नाही, आता अंतिम सुनावणीला सुरूवात करायला हवी." यानंतर न्यायमूर्तींनी म्हटले की, "मराठा आरक्षणाच्या विरोधात अनेक याचिका आहेत. त्यामुळे आपण सर्वांनी एकत्र बसून विरोधकांची बाजू नेमके कोण मांडणार हे ठरवा."

यावर विरोधी वकिल प्रदीप संचेती यांनी म्हटले की, "प्रत्येक याचिकाकर्त्याने विविध विषय वाटून घेतले आहे. प्रत्येकाला आपले मत मांडायचे आहे. त्यामुळे प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा अधिकार द्यायला हवा." यानंतर न्यायमूर्ती म्हणाले की, "पुढील सुनावणी १८ व १९ जुलैला सायंकाळी ५ वाजता घेऊया का?" यावर संचेती म्हणाले, "आम्हाला अडीच ते तीन दिवस युक्तिवाद करण्यासाठी द्या". यानंतर सरकारी वकिलांनी, "आम्हाला युक्तिवादासाठी दोन दिवस हवे आहेत." अशी मागणी केली.

यानंतर न्यायाधिश घुगे यांनी, "मराठी आरक्षणाची पुढील सुनावणी १८ तारखेला ३ वाजता आणि १९ जूलै २०२५ रोजी पुर्ण दिवस चालेल" अशी माहिती दिली. त्यानंतर १९ जुलैला पुढची तारीख जाहीर केली जाणार आहे. आज मराठा समजाच्या एसईबीसी आरक्षणवर कुठलीही स्थगिती नाही, त्यामुळे मराठा विद्यार्थ्यांना एसईबीसी एडमिशनचा मार्ग मोकळा झाला आहे. आता पुढील सुनावणी पुढ़िल महिन्यत १८-१९ जुलैला होणार आहे.

## पुण्यात चार सदस्यीय प्रभाग रचना लादली तर कोर्टात जाऊ - ठाकरे गट आणि कॉंग्रेस आक्रमक




**पुणे :** पुण्यातही मुंबई प्रमाणेच एक सदस्यीय प्रभाग रचना व्हावी. जर चार सदस्यीय प्रभाग रचना आमच्यावर लादली तर आम्ही या निर्णयाच्या विरोधात कोर्टात जाऊ, असा इशारा शिवसेना ठाकरे गटाने दिला आहे. तसेच पुण्यातील कॉंग्रेस पक्षाने देखील या चार सदस्यीय प्रभाग रचनेला विरोध केला आहे.

पुण्यातील चार सदस्यीय प्रभाग रचना लादली गेली तर या निर्णयाच्या विरोधात कोर्टात जाण्याचा इशारा ठाकरे गटाचे शहराध्यक्ष संजय मोरे यांनी यांनी दिला आहे. तसेच चार सदस्यीय प्रभाग हे महानगरपालिकेमध्ये योग्य नाही. त्याच्या बदल्यात एक सदस्यीय प्रभाग केला पाहिजे. असे केल्यास नगरसेवकाला नीट काम करता येते. भारतीय जनता पक्षाला फक्त सत्ता भोगायची आहे. नागरिकांच्या समस्यांवर त्यांना काम करायचे नाही. आमचा या निर्णयाला विरोध आहे. भारतीय जनता पार्टी मात्र नेहमीप्रमाणे यावेळीही रडीचा डाव खेळणार, अशी टीका काँग्रेस शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांनी केली आहे.

दरम्यान, राज्यात मुंबई वगळता इतर ठिकाणी बहूसदस्यीय प्रभाग आहेत. राज्यातील महापालिका निवडणुकीच्या प्रभाग रचनेचे आदेश देण्यात आले आहेत. त्यात पुणे, नागपूर ठाणे, नाशिक, पिंपरी चिंचवड, नवी मुंबई, वसई विरार, छत्रपती संभाजीनगर आणि कल्याण डोंबिवलीसारख्या महापालिकांचा समावेश आहे.

पुण्यात १६२ नगरसेवक असणार आहेत, त्यानुसार प्रभाग रचना केली जाणार आहेत. तर मुंबई महापालिकेत जुनेच २२७ प्रभाग कायम असून त्या ठिकाणी एक सदस्यीय प्रभाग असणार आहे. तसेच राज्यातील इतर महापालिकांमध्ये तीन ते चार सदस्यीय प्रभाग असणार आहेत. पुण्यामध्येही बहुसदस्यीय प्रभाग असणार आहेत.

ड वर्गातील महापालिकेत प्रभाग रचना ठरवताना सर्वच प्रभाग चार सदस्यांचे करायचे आहेत. परंतु जर सर्वच प्रभाग चार सदस्यांचे होत नसल्यास एक प्रभाग तीन किंवा पाच सदस्यांचा होईल. ड वर्ग महापालिकांमध्ये अमरावती, अहिल्यानगर, अकोला, कोल्हापूर, सोलापूर, सांगली-मिरज-कुपवाड, मिरा भाईंदर, उल्हासनगर, भिवंडी-निजामपूर, जळगाव, नांदेड, धुळे, मालेगाव, लातूर, चंद्रपूर, परभणी, पनवेल, इचलकरंजी आणि जालना या महापालिकेचा समावेश आहे.

अ वर्ग महापालिकांमध्ये पुणे आणि नागपूर महापालिकांचा समावेश होतो. ब वर्ग महापालिकेत ठाणे, नाशिक, पिंपरी चिंचवड या महापालिका येतात तर क वर्ग महापालिकेत नवी मुंबई, वसई-विरार, छत्रपती संभाजीनगर आणि कल्याण डोंबिवली यांचा समावेश होतो.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १२ जून २०२५


## अंबादास दानवेंनी घेतली प्रकाश महाजनांची भेट



ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी आज मनसेचे नेते प्रकाश महाजन यांची भेट घेतली. नारायण राणे यांनी प्रकाश महाजन यांना धमकी दिली होती. यानंतर अंबादास दानवे हे प्रकाश महाजन यांची विचारपूस करण्यासाठी त्यांच्या छत्रपती संभाजीनगर येथील निवासस्थानी पोहोचले. विशेष म्हणजे, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या एकत्र येण्याच्या चर्चा सुरू असतानाच अंबादास दानवे यांनी प्रकाश महाजनांची भेट घेतल्याने या भेटीची वेगळीच चर्चा रंगत आहे.

या भेटीबाबत बोलताना प्रकाश महाजन म्हणाले, आमचे जुने संबंध आम्ही पूर्वी एका पक्षात होतो भेटायला आलेत तेही पहिलवान आहेत मी ही पहिलवान आहे. एखाद्या मोठ्या पहिलवानाला पाडल्यावर ते आनंद व्यक्त करायला आले. त्यांनी संधी मी हिरावून घेतली एवढंच. त्यांना पाडायचे होते मी पाडले. यापूर्वीही आपल्यापेक्षा मोठ्या पैलवानाची कुस्ती खेळली आहे. नारायण राणे साहेबांना बीड काय असते हे दाखवून दिले. आकाशात चांगले ग्रह तारे एकत्र येत आहेत. काय होईल सांगता येत नाही. चांगले नक्षत्र असले की चांगली घटना घडते. धूमकेतू अजून चमकला नाही नक्षत्र चांगले दिसत आहेत.मी प्रकाश काका महाजन यांना भेटायला आलो आहे. गेल्या दोन-तीन दिवसात जे काही घडले त्याविषयी त्यांच भेट घ्यावी वाटली. तसे प्रकाश काका समर्थ आहेत. त्यांना आमच्या मदतीची गरज नाही पण, एक आलो. आम्ही त्यांच्यासोबत राहिलो, फिरलो त्यासाठी आलो, अशी प्रतिक्रिया अंबादास दानवे यांनी प्रकाश महाजनांची भेट घेतल्यानंतर दिली.

अंबादास दानवे यांना मनसे-शिवसेना युतीबाबत विचारले असता, ते ठरवण्यासाठी उद्धव आणि राज साहेब समर्थ आहेत ते जे मार्गदर्शन करतील तसे आम्ही चालणार. दोन्ही नेते यासाठी समर्थ आहेत, असे ते म्हणाले. नारायण राणे ज्येष्ठ नेते राहिले आहेत. मुख्यमंत्री राहिलेत. त्यांचा मुलगा वायफळ गप्पा मारतो, त्यावर नियंत्रण असायला हवे. कोणाला बाप म्हणतो, दुसऱ्या कोणाला बाप कशाला म्हणतो नारायण राणे आपले बाप आहेत, अशी टीका अंबादास दानवे यांनी नितेश राणेंवर केली.

मागील दोन-तीन दिवसांपासून राणे पिता-पुत्र आणि प्रकाश महाजन यांच्याव वाद सुरू आहेत. नितेश राणे यांनी 'राज-उद्धव एकत्र येण्याच्या चर्चेची खिल्ली उडवली होती. दोन्ही एकत्र येणार असल्याने झोप उडाली आहे, एकाचे २० आणि एकाचे ० आमदार आहेत. असे वक्तव्य नितेश राणेंनी केले होते. यावर प्रकाश महाजन यांनी नितेश राणेंची वैचारिक उंची उभे राहिल्यावर लवंगेएवढी, बसल्यावर विलायचीएवढी, अशा शब्दांत उत्तर दिले होते. या टीकेनंतर नारायण राणे संतप्त होत, लायकीत राहा, जास्त बोलाल तर उलट्या करायला लावेन अशी धमकीच प्रकाश महाजनांना दिली होती. त्यावर माझे बरे-वाईट झाले, तर नारायण राणे जबाबदार असतील महाजन म्हणाले होते. तसेच कणकवलीत जाऊन आंदोलन करेन, असा इशाराही दिला होता.

## निधन वार्ता



**दौलताबाद (जावेद अहमद) :** अब्दीमंडी येथील यशोदाबाई श्रीधर अप्पा लकडे वय ७५ वर्ष यांचे दि. १० मंगळवार, दुपारी १२ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती,तीन मुले,एक मुलगी असा परिवार आहे

## वटसावित्री पौर्णिमा निमित्त पैठण रोड विटखेडा वार्डात १००१ वडाच्या रोपांचे वाटप



**छत्रपती संभाजीनगर :** सौभाग्याचे प्रतीक असलेल्या पवित्र अशा वटसावित्री पौर्णिमेच्या निमित्त पैठण रोड विटखेडा परिसरात मा. महापौर नंदकुमार घोडेले मित्र मंडळ व विशाल भैया थोरात मित्र मंडळ व जॉइंट्स ईलाईट च्या अध्यक्ष नेहा सिद्धार्थ घोडेले तसेच विटखेडा येथील रहिवासी अंकिता विशाल थोरात यांच्या वतीने १००१ वडाच्या रोपाचे विधिवत पूजन करून रोपाचे वाटप करण्यात आले या उपक्रमाचा महिलांनी आनंद उत्सव साजरा करून कौतुक केले. यावेळी शिवसेना महिला आघाडी लक्ष्मी नरहिरे, जयश्री इंदापुरे, लक्ष्मी मस्के ,त्रिभुवन ताई, विटखेडा येथील विविध कॉलनी येथील रहिवासी छाया ढोणे, मंजुषा मोकाटे, जया पिंपळे, उमा बडवणे, अनिता पायगव्हाणे, कल्याणी पाटील, अश्विनी कुलकर्णी, सुजाता मोटे, मंगल वायकोस, गिल ताई, नैना वाकचौरे, विशाखा अनासपुरे, मायावती मराठे, कृतिका सिक्रे, प्रतिज्ञा राजपूत, नंदा मंडलिक, सुनिता खडके राणी थोरे सोनाली थोरे, आणिता भानुसे, गीता भानुसे, सुवर्णा भानुसे, पल्लवी कारले, कीर्ती जाधव, शुभ्रा पानगे, कमल शेळके, गंगा चाटे, चीरागी ताई, कांचन चोतमल, अंजली भालेराव, नंदा उमप, विजया अहिरे, गायत्री चौधरी अलका शेठीया, मंगल आमले सीमा राठोड सुरेखा कोलते, अंजली कांबळे, सोनाली आतकरे, हिनके ताई, बांडे काकू, काकूमंजिरी कुंडलवाला, चंदा गायकवाड, मंगल काळवणे, अरुणा घायाळ, बोरुडे ताई, कोळेकर ताई, साठे ताई, पवार ताई, बारहाते, ताई तेजस्विनी झोपाटे, भुसारी काकू, चव्हाण ताई, हजारे ताई, साळवे काकू, सोनवणे ताई, गलांडे ताई ,अहेर, जटाळे मॅडम, भक्कड ताई, शिंदे ताई, लोंढे काकू, नेमके ताई, मोमकर ताई, वैशाली पाटील, थोरात ताई, प्राजक्ता शिरसाट, नम्रता ताई, वैशाली कांगणे, जनाबाई गावंडे, कदम ताई, सोनवणे ताई, रागिणी मुंडे आदींची मोठी उपस्थिती होती




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १२ जून २०२५


## शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे आश्वासन फसवे अंबादास दानवेंचा सरकारवर हल्लाबोल



**छत्रपती संभाजीनगर :** क्रांती चौकातून ट्रॅक्टर मोर्चा काढण्यात आला. विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सरकारवर टीका केली. महायुती सरकारने शेतकऱ्यांना दिलेली कर्जमाफी, शेतकरी सन्मान योजना, पाणंद रस्ते, अन्नदाता ऊर्जादाता योजना यांसह अनेक आश्वासने दिली होती. मात्र या घोषणांची पूर्तता न झाल्याने उद्धव सेना आक्रमक झाली आहे.दानवे यांनी म्हटले की, महायुतीच्या घोषणा कागदावरच राहिल्या आहेत. शेतकऱ्यांना त्याचा कुठलाही लाभ मिळालेला नाही. गेल्या सात महिन्यांत राज्यात १००० पेक्षा अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. अर्थमंत्री अजित पवार यांनी कर्जमाफीच्या अपेक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक वर्षाच्या शेवटी कर्ज भरण्यास सांगितले.

सरकारने जीएसटी अनुदान शेतकऱ्यांना परत करण्याचे आश्वासन दिले होते, परंतु ते अद्याप पूर्ण झालेले नाही. सोयाबीन आणि कापसाचे भाव कमी करण्यासाठी परदेशातून आयात सुरू आहे. शेतकरी सन्मान योजनेची रक्कम १२ हजारांवरून १५ हजार रुपये करण्याचे आश्वासनही पूर्ण झाले नाही.

मोदी सरकारने हमीभावाच्या दीडपट भाव देण्याची घोषणा केली होती. मात्र शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी किंमतीत कापूस आणि सोयाबीन विकावे लागले आहे. दानवे यांनी या सर्व मुद्द्यांवरून सरकारवर जोरदार टीका केली आहे.

## बच्चू कडूंच्या आंदोलनाचा चौथा दिवस : प्रकृती बिघडली, मनोज जरांगेंनी घेतली भेट



**अमरावती :** प्रहार संघटनेचे अध्यक्ष आणि माजी आमदार बच्चू कडू यांचे अमरावतीत अन्नत्याग आंदोलन सुरू आहे. बच्चू कडूंना समर्थन देण्यासाठी प्रहारच्या दिव्यांग कार्यकर्त्यांकडून मुंबईत मंत्रालयासमोर आंदोलन करण्यात आले. या आंदोलनादरम्यान, पोलिसांनी प्रहारच्या कार्यकर्त्यांना अटक केली. तिकडे मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी बच्चू कडू यांची उपोषणस्थळी भेट देत तब्येतीची काळजी घेण्याची विनंती केली. यावेळी त्यांनी बच्चू कडूंच्या मागण्या मान्य करण्याची मागणी सरकारकडे केली.

शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी बच्चू कडू यांनी अन्नत्याग आंदोलन पुकारले आहे. त्यांच्या आंदोलनाचा आजचा चौथा दिवस आहे. अन्नाचा कणही पोटात न गेल्याने बच्चू कडू यांची प्रकृती खालावली असून सुमारे ३ ते ४ किलो वजन घटले आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी आज बच्चू कडू यांची आंदोलनस्थळी भेट घेतली.

बच्चू कडू आपल्या गोरगरीबांसाठी अनेक वर्षांपासून मोठ्या ताकदीने आणि हिमतीने संघर्ष करत आहेत. बच्चू भाऊंनी तब्येतीची काळजी घेतली पाहिजे. आंतरवालीत येऊन ते मला तब्येतीची काळजी घेण्यास सांगतात. मी इथे येऊन त्यांना तब्येतीची काळजी घेण्यास सांगतो. बच्चू भाऊंनी अन्नत्याग आंदोलनाचे माझे हत्यार उगाच घेतले. तुमचे पहिले हत्यार चांगले होते, असे मनोज जरांगे म्हणाले.

बच्चू भाऊ एकटे नाहीत. इथे प्रत्येक जण येत असेल. भाषण ठोकून जात असेल. पाठिंबा देत असतील. ही प्रथा या राज्याची अगोदर मोडली पाहिजे. प्रत्यक्ष रस्त्यावर प्रत्येकाने उतरले पाहिजे. कुठल्या बाबतीत न्याय मिळवायचा असेल, तर प्रत्यक्षात रस्त्यावर यावे लागते. आज बच्चू भाऊ आपल्यासाठी जीव द्यायला तयार असतील, तर समाजाने सगळ्या शेतकरी ताकदीने रस्त्यावर उतरले पाहिजे, असे आवाहन मनोज जरांगे यांनी केले.

तुमच्या मागण्या मान्य नाही केल्या, तर बघा आम्ही काय करतो. आम्ही सगळे तुमच्या सोबत आहोत. सरकारला सळो की पळो करून सोडतो. आमच्यात तेवढी ताकद आहे, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला. देवेंद्र फडणवीस साहेबांनी लक्षात ठेवावे, विरोधाला विरोध करायचा अशांपैकी आम्ही नाही. आम्ही वयाने लहान असलो, तरी समज मात्र आम्हाला आहे. निर्णय क्षमता आमच्यात आहे. मी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना सांगतो, तुम्ही बच्चू भाऊंच्या मागण्यांची तातडीने दखल घ्या. फोनाफोनी बंद करा, अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली.

सर्वात आधी आपण शेतकरी आहोत. ओबीसी, मराठा हे सर्व घरी गेल्यावर. इथे जात-पात आणायची नाही. आपण सर्व शेतकऱ्यांचे पोर आहोत. एकजुटीने आपण लढले पाहिजे, असे आवाहन मनोज जरांगे यांनी केले.

बच्चू कडू यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी दिव्यांगांनी मुंबईत मंत्रालयासमोर आंदोलन केले. यावेळी पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेतले. यावरून बच्चू कडू आक्रमक झाले आहेत. कार्यकर्त्यांना त्रास दिल्यास मुंबई गाठू, असा इशारा बच्चू कडू यांनी सरकारला दिला आहे.


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)

विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १२ जून २०२५


## मुंबई महापालिकेसाठी ठाकरेंची रणनिती ठरली



**मुंबई :** राज्यात पुढील तीन-चार महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्था आणि महापालिकेच्या निवडणुका जाहीर होऊ शकतात. या पार्श्वभूमीवर प्रभाग रचनेचे आदेश नगरविकास विभागाने जारी केले. हे आदेश आल्यानंतर शिवसेना ठाकरे गटाने मुंबई महानगरपालिकेसाठी कंबर कसली आहे. उद्धव ठाकरे गटाने विशेष रणनिती आखली असून मुंबईतील उपनेत्यांवर विशेष जबाबदारी सोपवण्यात आली आहे. पक्षाने १२ उपनेत्यांवर विधानसभा निहाय जबाबदाऱ्या वाटप करण्यात आल्या आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची घोषणा अद्याप झाली नसली, तरी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने आतापासूनच मैदानात उतरण्याची तयारी सुरू केली आहे. मातोश्रीवर झालेल्या बैठकीत ठाकरे गटाकडून मुंबई महानगर पालिकेच्या पार्श्वभूमीवर उपनेत्यांवर विधानसभानिहाय जबाबदारीचे वाटप करण्यात आले आहे. मतदार संघात जाऊन आढावा बैठका, माजी नगरसेवक, शाखा प्रमुख इतर पदाधिकाऱ्यांशी चर्चा करण्याचे निर्देश पक्षाकडून या उपनेत्यांना देण्यात आल्याची माहिती आहे.

१. अमोल कीर्तीकर – दहिसर, बोरिवली, मागाठाणे

२. उद्धव कदम – चारकोप, कांदिवली, मालाड पश्चिम

३. विलास पोतनीस – दिंडोशी, गोरेगाव, जोगेश्वरी पूर्व

४. विश्वासराव नेरूरकर – वर्सोवा, अंधेरी पूर्व, अंधेरी पश्चिम

५. रवींद्र मिर्लेकर – विलेपार्ले, वांद्रे पूर्व, वांद्रे पश्चिम

६. गुरुनाथ खोत - चांदिवली, कलीना, कुर्ला

७. नितीन नांदगावकर – विक्रोळी, भांडुप, मुलुंड

८. सुबोध आचार्य – घाटकोपर पूर्व, घाटकोपर पश्चिम, शिवाजीनगर – मानखुर्द

९. मनोज जमसूतकर – अनुशक्ती नगर, चेंबूर, सायन कोळीवाडा

१०. अरुण दूधवडकर – धारावी, माहीम, वडाळा

११. अशोक धात्रक – वरळी, दादर, शिवडी

१२. सचिन अहिर – मलबार हिल, कुलाबा, मुंबादेवी

दरम्यान, मुंबई महापालिकेची निवडणूक सर्वात महत्त्वाची निवडणूक मानली जाते. देशातील सर्वात महापालिका असलेल्या मुंबईच्या महापालिकेच्या निवडणुकीकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागून असते. मुंबई महापालिका हा उद्धव ठाकरेंच्या पक्षाचा बालेकिल्ला समजला जातो. मागील २५ वर्षांपासून या महापालिकेवर शिवसेनेचे अधिराज्य राहिले आहे. विधानसभा निवडणुकीत ठाकरे गटाचा जनाधार घटल्याने मुंबई महापालिकेची निवडणूक त्यांच्यासाठी अस्तित्वाची लढाई असणार आहे.

राज्य सरकारने महापालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतींसाठी प्रभाग रचना करण्याचे आदेश जारी केले आहेत. या आदेशानुसार 'अ', 'ब' आणि 'क' वर्गातील महानगरपालिकांसाठी प्रभाग रचना करण्यात येणार आहे. महापालिकांच्या प्रभाग रचनेसंदर्भात नवे आदेश जारी केले असतानाच मुंबई महापालिकेच्या निवडणुका मात्र जुन्याच २२७ प्रभागांच्या रचनेनुसार होणार असल्याचे निश्चित झाले आहे. त्यामुळे मुंबई महापालिकेत पुन्हा एकदा एकसदस्यीय प्रभाग पद्धतीच लागू राहणार आहे.

मुंबईमध्ये सुरुवातीला २२७ प्रभाग होते. मात्र, महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळात प्रभागसंख्या वाढवून २३६ करण्यात आली होती. त्यानंतर सत्ताबदल होऊन महायुती सरकार सत्तेत आल्यानंतर ही संख्या पुन्हा २२७ वर आणण्यात आली. या निर्णयाला न्यायालयात सर्वोच्च आव्हान देण्यात आले होते. मात्र, न्यायालयाने ती याचिका फेटाळून लावल्यामुळे २२७ प्रभाग असणार आहेत.

## शरद पवार यांनी मानले नरेंद्र मोदी यांचे आभार



**अहिल्यानगर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटण्यासाठी सुप्रिया सुळे गेल्या असता, मोदींनी शरद पवार यांच्या तब्येतीची विचारपूस केली असल्याची माहिती समोर आली होती. पंतप्रधानांनी माझ्या तब्येतीची विचारपूस केल्याबद्दल मी त्यांचा आभारी असल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे. या संदर्भात शरद पवार यांनी दोनच शब्दात पंतप्रधानांनी केलेल्या चौकशी बद्दल आभार मानले आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या काल झालेल्या वर्धापन दिन मेळाव्यानंतर शरद पवार आज अहिल्या नगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. या दरम्यान त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. मी त्यांचा 'आभारी आहे' असे म्हणत शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आहे. शरद पवार यांच्या प्रकृतीची विचारपूस पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुप्रिया सुळे यांच्याकडे केली होती. याबाबतचे वृत्त समोर आल्यानंतर पत्रकारांनी शरद पवार यांना या संबंधीचा प्रश्न विचारला होता. त्यावर शरद पवार यांनी केवळ दोन शब्दात आपली प्रतिक्रिया दिली आहे.

गेल्या काही दिवसांपासून शरद पवार हे अजित पवार यांच्याबरोबर महायुती म्हणजेच एनडीएमध्ये सामील होणार असल्याची चर्चा रंगली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर शरद पवार यांची नरेंद्र मोदी यांनी केलेली विचारपूस आणि शरद पवार यांनी दिलेले उत्तर याबाबत आता चर्चा रंगली आहे.

हवामान खात्याकडून आलेले माहिती चांगली आहे. अजून पाऊस झाला नसला तरी चिंता करण्याचे कारण नाही, असे हवामान विभागाने म्हटले आहे. आणि अलीकडच्या काळातील अनुभव पाहता हवामान विभाग जे सांगते, तीच वास्तविकता मोठ्या प्रमाणात असल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे.

जयंत पाटील यांनी स्वतः नव्या पिढीला प्रोत्साहन देण्याचे सुचवले आहे. गेल्या आठ वर्षांपासून ते हे पद सांभाळत आहेत. त्यामुळे याविषयी अद्याप निर्णय झालेला नाही. आता पुढील काळात बघूयात, अशा शब्दात शरद पवार यांनी जयंत पाटील यांच्या राजीनाम्याच्या पुढाकारावर आपली प्रतिक्रिया दिली आहे. जयंत पाटील यांच्या राजी नामाच्या तयारी नंतर आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा नवीन प्रदेशाध्यक्ष कोण असेल? याबाबत चर्चा रंगली आहे. आमदार शशिकांत शिंदे तथा राजेश टोपे यांचे नाव प्रामुख्याने पुढे येत आहे.


